Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldgrt.lbp.world**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016



Golden Research Thoughts

GRT

# श्री क्षेत्र नारायण महाराज बेट केडगांव : ऐतिहासिक माहितीपट

कोकणे अश्विनी रोहीदास
तृतीय वर्षकला इतिहास विभाग.
मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.

## प्रस्तावना : —

श्री क्षेत्र नारायण महाराज बेट, केडगांव : ऐतिहासिक माहितीपट या विषयावर प्रस्तुत ऐतिहासिक संशोधन करण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये नारायण महाराज बेटाचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. तसेच या बेटातील ऐतीहासिक मंदिरे — दत्त मंदिर व समाधी मंदिर यांचा सखोलापणे अभ्यास करण्यात आला आहे. तसेच या मंदिरातील ऐतिहासिक मूर्ती व मंदिरावरील प्राचीन कलाकुसर यांची माहिती सादर करण्यात आहे.

तसेच येथील निवासस्थाने, कचेरी, (संस्थेचे कार्यालय), ग्रंथालय, ऋग्वेदीय वेदपाठशाळा यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधनासाठी लिखित साधने तसेच प्राथमिक समकालीन व्यक्तीसंबंधीचे लेखन, वस्तुरूप साधने, मंदिरे तसेच अलिखित साधने — इमारती, पुराण, वास्तुंचे अवशेष या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी प्रा. डॉ. देविदास वायदंडे व प्रा. दत्तात्रय डुबल यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

## संशोधनाची उद्दिष्टे :

ऐतिहासिक वास्तूंचा सविस्तरपणे अभ्यास करणे.
प्राचीन वास्तु व त्यावरील कलाकुसर यांचा अभ्यास करणे.
श्री क्षेत्र नारायण बेट यांविषयी ऐतिहासिक माहितीचा चिकित्सक अभ्यास करणे.
श्री सदगुरू नारायण महाराज यांच्याविषयी सखोल माहिती जमा करणे.
श्री नारायण बेट परिसरातील सोयी — सुविधांची माहिती जमा करणे.
नारायण बेट, केडगांव या स्थानिक इतिहासाची ओळख करून घेणे आणि स्थानिक इतिहास लेखनात भर घालणे.



## भौगोलिक स्थान :

पुण्यापासुन 60 कि.मी. अंतरावर सोलापूर रोडला, सुपा — मोरगाव रस्त्यावर श्री नारायण महाराजांनी या स्थानाची निर्मिती केली. एकुण 11 एकरावर हे स्थान वसले आहे. या स्थानाच्या चारही बाजूने ओढा असल्याने या श्री महाराजांच्या क्षेत्राला 'श्री नारायण बेट' असे संबोधले जाते.

'चारही बाजूने जे ओढे आहे त्याचे नाव सदगुरू महाराज ओढा असे आहे. या बेटाचा विस्तार 11 एकरावर असून त्यातील काही क्षेत्रावर शेती केली जाते.

अनेक मोठमोठी वृक्ष आहेत, वृक्ष आहेत, वड, चिंच, असे जास्त सावली देणारी वृक्ष आहेत.

## स्थापना :

श्री महाराजांची जन्मभुमी कर्नाटक, पण कर्मभूमी महाराष्ट्रातील दौंड तालुक्यातील सध्याचे 'श्री नारायण बेट' श्री क्षेत्र गाणगापूर

येथे तपश्चर्या करून श्री दत्तात्रयांच्या आदेशावरून श्री महाराज येथून दीड कि.मी. अंतरावर असलेल्या जुन्या बेटात प्रथम आले, तेथे येणाऱ्या जनसामान्यांना श्री महाराजांचे अध्यात्मिक व पारमार्थिक अनुभव येऊ लागल्याने तेथे श्री महाराजांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची गर्दी वाढू लागली म्हणून श्री महाराजांनी इ.स.1910 मध्ये सध्याच्या जागेवर असलेले फड्या निवडुंगाचे जंगल साफ करून इ.स. 1911 मध्ये दत्तात्रयाचे मंदिर बांधले. नंतर त्यांच्या भक्तांनी श्री महाराजांसाठी भव्य निवासस्थान व स्वताला त्यांच्या पायाशी राहण्यासाठी म्हणून स्वतःसाठी घरे बांधली.

या बेटामध्ये श्री दत्ता मंदिर आहे. अन्नपूर्णा गृह आहे. श्री दत्त मंदिरातील आवारात श्री कोटेश्वर मंदिर, अश्वथ्य वृक्ष आहे. श्री महाराजांचे निवासस्थान, समाधी मंदिर आहे. 11 विहिरी आहे. संस्थानाची शेती आहे. एकावेळी 1000 व्यक्ती जेवणास बसतील अशा दोन मोठ्या धर्मशाळा आहेत.

### *श्री नारायण बेट येथील श्री दत्त मंदिर :*

निवडुंगाचे संपुर्ण जंगल साफ करून तयार झालेल्या नंदनवनात इ.स. 1911 च्या सुमारास श्री दत्त मंदिराच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात झाली. इ.स. 1912 मध्ये मंदिर बांधून पूर्ण झाले.

मंदिराची रचना अतिशय शास्त्रशुध्द व फारच कलात्मक आहे, देवाचा गाभारा 8 × 8 चौरस फुट आहे. आत दोन्ही बाजूला तेवढ्याच आकाराच्या 2 खोल्या आहेत. गाभाऱ्याच्या दारावर वरद्लक्ष्मीची मूर्ती आहे. दरवाज्याजवळ जय विजय उभे आहेत. दक्षिणेकडील कोनोड्यात उजव्या सोंडेचे सिध्दिविनायक श्री गजानन आहेत व उत्तरेकडील कोनाड्यात दक्षिणमुखी श्री हनुमान आहेत. दोन्हीही मूर्ती संगमरवरी आहेत. सभामंडप चार खांबी असून उंची वीस फुट, लांबी पंचवीस फुट, रूंदी पंधरा फुट आहे. मंडपाच्या तक्तपोशीमध्ये राधाकृष्णाचा प्लास्टर ऑफ प्यारीसच्या मूर्ती बसविलेल्या आहेत. सभामंडपाच्या खांबावर आतील बाजूस दशावताराच्या मूर्ती आहेत.

इ.स. 1932 मध्ये मंडपाच्या सभोवती चारही बाजूला दुसरा भव्य सभामंडप बांधलेला आहे. नव्या सभामंडपावर शंखचक्रगदाधारी श्री विष्णुची प्लास्टरची मूर्ती बसवलेली आहे. प्रदक्षिणेच्या वाटेवर एका बाजूला श्रीराम पंचायतन व दुसऱ्या बाजूला पाच पांडव व द्रौपदी यांच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्याच्या भिंतीत बाहेरील बाजूस दक्षिणेस यमराज, पश्चिमेस वरूण व उत्तरेकडे कुबरे यांच्या छोट्या मूर्ती आहेत. पूर्वेकडे भव्य महाद्वार आहे.

### *श्री दत्त मूर्तीची स्थापना :*

अशा या भव्य दिव्य मंदिराच्या गाभाऱ्यात श्री दत्त मूर्तीची विधीपुर्वक प्राणप्रतिष्ठा स्वत : श्री महाराजांनी वैशाख पंचमी, शके 1835 म्हणजेच रविवार दिनांक 11 मे 1913 या दिवशी केली.

तीन शिरे, सहा हात अशी दत्तमुर्ती पाहताच सुखी व्हावे, समाधान वाटावे, डोळयांचे पारणे फिटावे इतकी नयनरम्य, मनोहर, नाजूक, व देखणी अशी संगमरवरी मूर्ती आहे. भक्तांना दुःखितांना पीडितांना अभय देणारे भाव चेहऱ्यावर आहेत.

आपल्याला राहण्यासाठी योग्य निवासस्थान मिळाले या समाधानात, उजव्या पायावर रेलून उभे असलेले श्रीदत्त महाराज जणू काही विश्रांतीच घेत आहेत असे मूर्ती पाहून वाटते.

साधारणपणे श्रीदत्त मूर्ती विष्णू मुखप्रधान असतात पण बेटातील ही मुर्ती शिवमुखप्रधान आहे. इतर मूर्तीच्या हातातील आयुधे म्हणजे शंख, चक्र, गदा, पद्म, त्रिशुळ, व कमंडलू अशी असतात. पण बेटातील मूर्तीच्या हाती आयुधे म्हणजे शंख, चक्र, माळ, पोथी, त्रिशूळ व कमंडलू अशी आहेत.

### *श्री क्षेत्र नारायण बेट येथे होणारे प्रमुख उत्सव :*

***चैत्र :*** गुढीपाडवा, श्रीराम नवमी, दवणा, एकादशी, श्री हनुमान जयंती.
***वैशाख*** : वैशाख शुध्द पंचमीला श्रीदत्त मूर्ती प्रतिष्ठापना दिन, प्रतिष्ठान ते पंचमी कीतन.
***जेष्ठ :*** जेष्ठ शुध्द सप्तमीला श्री नारायण जयंती.
***आषाढ :*** चातुर्मासारंभ सकाळी 6 ते 7 सामुदायिक नामस्मरण, सायंकाळी श्रींची श्री सत्यनारायण पूजा.
***श्रावण :*** रक्षाबंधनाचे दिवशी सकाळी श्रावणी, पौर्णिमेस सायंकाळी श्रींची श्री सत्यनारायण पूजा, श्रावण वद्य, द्वादशीस श्री नारायण महाराज पुण्यतीथी –
***भाद्रपद :*** गणेश चतुर्थी, पार्थिव श्री गणेश पूजन, गौरी आवाहन, 5 व्या दिवशी श्री गणेश मूर्ती विसर्जन, पौर्णिमा श्री गुरूपौणिमा उत्सव.
***आश्विन :*** दीपावली, पौर्णिमेस सायंकाळी श्रींची श्रीसत्यनारायण पूजा, आरतीनंतर ब्राम्हणपुजन व मसाला दुध.
***कार्तिक :*** स्मार्त एकादशीस चातुर्मास समाप्ती, द्वादशीस तुलसी विवाह, त्रयोदशीस दहीहंडी उत्सव, पौर्णिमेस सायंकाळी श्रींची श्रीसत्यनारायण पूजा, चातुर्मासात श्री समाधी मंदिरात अखंड नामस्मरण होते. येणारे भक्त नामस्मरणात सहभागी होऊ शकतात.
***मार्गशीर्ष :*** शुद्ध दशमीस श्री समाधी वर्धापन दिन, शुद्ध एकादशीपासून श्रीदत्त जन्मोत्सवासाठी कीर्तन, दुसऱ्या दिवशी पाऊल घडीचे कीर्तन.
***पौष :*** भोगी व मकरसंक्रांती.
***माघ*** : दैनंदिन धार्मिक कार्यक्रम, महाशिवरात्री.
***फाल्गुन :*** हुताशनी पौणिमा.

### *ऋवेदीय वेदपाठशाळा व ग्रंथालय :*

महाराजांना प्रिय असलेली ऋवेदीय वेदपाठशाळा बेटात सुरू आहे. या वेदपाठशाळेची स्थापना 18 जून 2010 मध्ये सुरू करण्यात

आली. या वेदपाठशाळेचा संपुर्ण खर्च संस्थेकडून केला जाते. या वेदपाठशाळेमध्ये ऋवेदीय अध्यापन दिले जाते. नामांकित गुरू अध्यापन करतात. ब्राम्हण मुलांनाच ऋवेदीय वेदपाठशाळेत प्रवेश दिला जातो. मुंजी झाल्यानंतर म्हणजे आठ वर्षानंतर प्रवेश दिला जातो.

या ठिकाणी श्री नारायण वाचनालय सुरू आहे. या ग्रंथालयाची स्थापना 29 / 9 / 1982 रोजी झाली. रजि. नं. ए 7 / 12 असा आहे. या ग्रंथालय श्री नारायण महाराज यांचे जीवनचरित्र, माहितीपट तसेच कार्यकाल यांवर आधारित पुस्तकांचा समावेश आहे.

### *श्री सद्गुरू नारायण महाराजांचे जीवन व कार्य :*

श्री महाराजांजवळ सर्वधर्मसमभाव होता. सर्व धर्माचे, जातीचे पंथाचे लोक त्यांचे अनुयायी होते. सर्व पंथाबद्दल व धर्मांबद्दल श्री महाराजांना आदर होता. दुष्काळातून आलेली अनेक कुटुंबे त्यांनी वसविली. अनाथांना आश्रय दिला. शाळा, वेदपाठशाळा सुरू केल्या. पोस्ट सुरू केले.

अन्नपूर्णागृहात माता अन्नपुर्णेची प्रतिष्ठापना केली. अव्याहत अन्नदान सुरू केले. जे आजही चालू आहे. अनेक यज्ञ याग केले. 1908 श्री सत्यनारायण पूजा केल्या. असंख्य वेळा 108 श्री सत्यनारायण पूजा जनसामाण्याकडून करविल्या. अतिरूद्र महारूद्र केले, कोटी लिंगार्चन केले. सामान्यजनांना बरोबर घेवून भारतभर तीर्थयात्रा केल्या.

त्यांच्या जन्म 20 मे 1885 रोजी कर्नाटक राज्यात, बगलपूर येथे झाला. ते 14 महिन्यांचे असतानाच त्यांचे वडील वारलेत व चार वर्षांचे असताना आईंचे निधन झाले. त्यांचा सांभाळ त्यांच्या आजीने (आईची आई) केला.

एका संतांच्या सांगण्यावरून ते 1 वर्षाकरिता गाणगापूरला गेले. तेथे त्यांनी शिक्षा घेतली व ते केडगाव येथे आले.

सद्गुरू म्हणून ते वाराणसी, केदारानाथ, नेपाळ, ओंकारेश्वर, महाबळेश्वर, मधुराई, चिदंबरम, कांचीपुरम, तिरूपती, रामकृष्ण, आश्रम, कलकत्ता, बंगलोर, मिझोर, द्वारका, सोमनाथ, नावारूपास आले.

त्यांनी आपल्या अध्यात्मातून लोकांना 'प्रत्येकाला देवा समान वागवा' हा बहुमोल संदेश दिला.

त्यांनी 3 सप्टेंबर 1945 म्हणजे वयाच्या 60 व्या वर्षी केडगाव येथे समाधी घेतली.

### *श्री समाधी मंदिर व श्री मंदिर आरतीच्या वेळा :*

≫ ***श्री समाधी मंदिर***

आरती रोज सकाळी 7.15 ते 7.30
आरती रोज सायं. 7.00 ते 7.30
दर गुरूवारी आरती सांय. 6.45 ते 7.15

>> ***श्रीदत्त मंदिर***

आरती रोज सकाळी 6.45 ते 7.00
आरती रोज दुपारी 11.45 ते 12.00
आरती रोज सांय. 7.45 ते 9.30 (या वेळात आरती व अष्टावधान सेवा)
दर गुरूवारी रात्री 7.45 ते 9.30 (पालखी, आरती व इतर सेवा)

>> ***श्रीदत्त मंदिर दुपारी 12 ते 4 बंद असते.***

>> ***संस्थानमधील प्रसादाच्या (भोजनाची वेळा)***

दुपारी 12 ते 1.30 (पुर्वसूचना दुपारी 11.00 पर्यंत द्यावी)
रात्री 8.30 ते 9.00 (पुर्वसूचना सांय. 7.30 पर्यंत द्यावी.)

### *बेटाचे नियम :*

- मुक्कामासाठी येणाऱ्या भक्तांनी आपल्या नावाची नोंदणी संस्थांनच्या कचेरीत आल्यावर लगेच करणे अत्यंत आवश्यक आहे. नाव नोंदणी करताना, ओळखपत्राची झेरॉक्स देणे आवश्यक आहे.
- दर्शनासाठी येणाऱ्या भक्तास फक्त एकच दिवस मुक्काम करता येईल.
- पारायणासाठी येणाऱ्या भक्तांनी पूर्वसूचना देऊन राहण्याची परवानगी घ्यावी.
- वास्तव्यास आल्यास संस्थानकडून, संस्थानच्या नियमानुसार राहण्यासाठी जागा दिली जाईल.
- वास्तव्यास दिलेल्या जागेचा दुरूप्रयोग करू नये. दुरूप्रयोग केलेला आढळल्यास संस्थानकडून कायदेशीर कारवाई केली जाईल
- संस्थानकडून दिलेल्या वस्तू व्यवस्थित ठेवणे व परिसराची स्वच्छता राखणे ही प्रत्येक भक्ताची जबाबदारी राहील.
- प्रसादाच्या वेळेतच प्रसाद मिळेल.
- दैनंदिन होणाऱ्या आरतीस व धार्मिक कार्यक्रमास येणाऱ्या भक्तांची उपस्थिती अपेक्षित आहे.
- कुठलाही धार्मिक कार्यक्रम उदा. अभिषेक, श्री सत्यनारायणपूजा, श्रींची पाद्यपूजा वगैरे करावयाचे असल्यास संस्थानच्या कचेरीतच पैसे भरून पावती घ्यावी. परस्पर करू नये.
- श्री समाधी व श्रीदत्त मंदिरात मोबईलचा व कॅमेराचा वापर करू नये.
- नियमांमध्ये फेरबदल करण्याचा पुर्ण अधिकार संस्थानकडे राहील.

### संशोधनाचे निष्कर्ष :

- श्री क्षेत्र नारायण बेटातील श्रीदत्त मंदिर व समाधी मंदिर या भव्य व अतिशय सुंदर प्राचीन वास्तू आहेत.
- या बेटातील श्रीदत्त मंदिरातील दत्ताची मूर्ती विलोभनीय व नयनरम्य आहे.
- या बेटातील आरतीच्या वेळा तसेच आरतीपूर्वी किंवा आरतीनंतर घंटा व प्रदिक्षिणा न घालण्याचे वैशिष्ट्ये नाविन्यपूर्ण आहे.
- परिसर स्वच्छ, वृक्ष वेलींनी नटलेला आहे. पार्किंगची व्यवस्था आहे.
- ठिकठिकाणी सूचना फलक व त्यावरील माहिती सुंदरपणे लिहिली आहे.
- श्रीदत्त मंदिरातील खांबावरील मूर्ती, कलाकुसर, मंडपाची रचना शास्त्रशुदध आहे.
- श्री नारायण महाराजांजवळ सर्वधर्म समभाव होता. तरीदेखील सर्व जाती – धर्माच्या मुलांना ऋवेदीय वेद्पाठ्शाळेमध्ये प्रवेश दिला जात नाही.
- बेटांची संपुर्ण माहिती देण्यासाठी मार्गदर्शक उपलब्ध होत नाही.
- विविध प्रकारच्या विधी व त्यासाठी देणग्या घेतल्या जातात हे एक प्रकारे कर्मकांडच आहे.
- श्री समाधी मंदिर व श्रीदत्त मंदिरात मोबाईलचा व कॅमेराच्या वापरास बंदी आहे, हे स्वागतार्ह आहे.
- ऐतिहासिक व पर्यटनस्थळ म्हणून श्रीक्षेत्र नारायण महाराज बेट सुंदर आहे.

### संदर्भ ग्रंथ :

1.श्री क्षेत्र नारायण महाराज बेट : माहितीपत्रक
2.श्री नारायण महाराज : जीवनपट
3.श्री नारायण महाराज : चरित्र
4.श्री क्षेत्र नारायण बेट : ऐतिहासिक वास्तू
5.www. betnarayanmaharaj.com.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.www.oldgrt.lbp.world